महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID :- sm2.scsd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.२१५/एसएम-२ दिनांक :- ०२ जानेवारी, २०२४

मान्यता पत्र (शुध्दीपत्रक)

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट,
दुसरा मजला, अलंकार सिनेमा बिल्डींग, पुणे-४११ ००१.

विषय - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्राबाबत...
अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे संचलित अलार्ड हायस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अॅन्ड सायन्स, सर्व्हे नं.४७/५+६+७, मारूंजी, ता. मुळशी, जि. पुणे.

संदर्भ- मान्यता पत्र, क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.२१५/एसएम-२, दिनांक १८.०५.२०२२.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे संचलित अलार्ड हायस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अॅन्ड सायन्स, सर्व्हे नं.४७/५+६+७, मारूंजी, ता. मुळशी, जि. पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक ( इ. १ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ, सर्व शाखा) शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरीता संदर्भाधिन पत्रान्वये मान्यता पत्र देण्यात आले आहे. सदर मान्यता पत्रामध्ये शाळेच्या "सर्व्हे नं.४७/५+६+७, मारूंजी, ता. मुळशी, जि. पुणे" ऐवजी "सर्व्हे नं.४७/५+६+७ व सर्व्हे नं. ५०/१+२/१+१, मारूंजी, ता. मुळशी, जि. पुणे" असे वाचावे.

( विवेक सपकाळ )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत -

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३) संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७) निवड नस्ती- (एसएम-२/२१५/२०२१).

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:-  Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.२१५/एसएम-२  दिनांक:- १८ मे, २०२२

## मान्यता पत्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट,

सर्व्हे नं.५०, मारुंजे, राजीव गांधी इन्फोटेक पार्क जवळ, पुणे-४११०५७.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे संचलित अलार्ड हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स, सर्व्हे नं.४७/५+६+७, मारुंजी, ता.मुळशी, जि. पुणे.**

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.२१५/एसएम-२, दिनांक २९/०६/२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून अलार्ड हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स, सर्व्हे नं.४७/५+६+७, मारुंजी, ता.मुळशी, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ, सर्व शाखा) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे संचलित अलार्ड हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स, सर्व्हे नं.४७/५+६+७, मारुंजी, ता.मुळशी, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ, सर्व शाखा) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे :-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

Scanned with CamScanner